आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : ७ ऑगस्ट, २०२४

ठळक बातम्या

1. कुस्तीपटू विनेश फोगाटच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर भारतीय ऑलिम्पिक संघटनेने जागतिक कुस्ती महासंघाकडे निषेध नोंदवल्याची केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ मनसुख मांडविय यांची लोकसभेत माहिती.
2. बांगलादेशाच्या हंगामी पंतप्रधानपदी नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनुस यांची नियुक्ती.
3. वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता, पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र येणार ओलिताखाली.
4. हातमाग उत्पादनांच्या मार्केटिंग करिता पुढाकार घेणं आवश्यक असल्याचं खादी आणि ग्रामोद्योग महामंडळाचे केंद्रीय सदस्य जयप्रकाश गुप्ता यांचं प्रतिपादन.
5. नागपुरातील इतवारी भागात अत्तराच्या गोदामाला आग, एका व्यक्तीचा मृत्यू तर तीन गंभीर जखमी.

**विनेश फोगट/क्रीडा मंत्री + ऑलिंपिक**

काल उपांत्य सामना जिंकल्यावर कुस्तीपटू विनेश फोगट हिला आज सकळी निर्धारित निकषांपेक्षा अधिक वजन भरल्याने अपात्र घोषित करण्यात आलं.

विनेश फोगटच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर भारतीय ऑलिम्पिक संघटना IOA ने युनायटेड वर्ल्ड रेसलिंगचा निषेध नोंदवला आहे, असं केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी आज सांगितलं. लोकसभेत स्वतःहून दिलेल्या निवेदनात मांडविय म्हणाले की आयओएला या प्रकरणी सर्व शक्यता पडताळून पाहण्यास सांगितलं आहे.

जागतिक कुस्ती महासंघाच्या नियमांनुसार जर कोणताही खेळाडू विशिष्ट वजन गटाच्या निकषात अपयशी ठरला तर त्यांना स्पर्धेतून अपात्र ठरवलं जातं आणि कोणत्याही श्रेणीशिवाय त्यांना शेवटच्या स्थानावर ठेवलं जातं. विनेश फोगट 50 किलो वजनी गटात खेळत होती आणि तिचे वजन निर्धारित निकषांपेक्षा 100 ग्रॅम जास्त आढळल्याची माहिती क्रीडा मंत्र्यांनी सभागृहाला दिली. दरम्यान 'विनेश, तुम्ही भारताचा अभिमान आहात आणि प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणा आहात. आजचा धक्का दुखावणारा आहे. परंतु आव्हाने स्वीकारणं हा तुमचा स्वभाव राहिला आहे. आम्ही सर्व भारतीय तुमच्या सोबत

असल्याचा' दिलासा देणारा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर सामायिक केला आहे.

ऑलिंपिक स्पर्धेत आज महिलांच्या टेबल टेनिस स्पर्धेत मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत या खेळाडूंची चमू जर्मनीविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीत ३-१ ने पराभूत झाली.
आज तर तीन हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीच्या अंतिम फेरीत अविनाश साबळे सहभागी होणार आहे. भारतीय वेळेनुसार मध्यरात्री दीड वाजेनंतर ही शर्यत होईल. तर भारोत्तोलनात महिलांच्या ४९ किलो वजनी गटात मीराबाई चानू सहभागी होणार आहे.

## मोहम्मद युनुस

बांगलादेशाचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी तिथली संसद बरखास्त करून हंगामी सरकारच्या प्रधानमंत्रीपदी नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनुस यांची नेमणूक केली आहे. लष्कराच्या तिनही दलांचे प्रमुख आणि विद्यार्थी संघटनांच्या शिष्टमंडळासोबत काल झालेल्या बैठकीनंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केला. मोहम्मद युनुस यांनी ग्रामीण बँकांच्या माध्यमातून गरीबीविरोधी मोहीम राबवल्याबद्दल २००६ मध्ये त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

सरकारमधल्या अन्य मंत्र्यांची निवड विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून केली जाईल, अशी माहिती राष्ट्रपतींच्या जनसंपर्क सचिवांनी माध्यमांना दिली. दरम्यान बांग्लादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांची स्थानबद्धतेतून सुटका करण्यात आली आहे. दरम्यान बांगलादेशात आतापर्यंत झालेल्या हिंसाचारात ४४० जणांचा मृत्यू झाला आहे.

## वक्फ सुधारणा विधेयक

प्रस्तावित वक्फ सुधारणा विधेयकाद्वारे सध्याच्या वक्फ संबंधित कायद्यांमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. या कायद्याचं सध्याचं वक्फ कायदा १९९५, हे नाव बदलून त्याजागी, एकत्रित वक्फ व्यवस्थापन, सशक्तिकरण, कार्यक्षमता आणि विकास कायदा १९९५, असं केलं जाणार आहे. तसंच, वक्फ बोर्डाच्या कार्यकारिणींमध्ये मुस्लिम महिला आणि बिगर मुस्लिमांना योग्य प्रतिनिधीत्व मिळावं, हे सुनिश्चित केलं जाणार आहे. याशिवाय बोहरा आणि आगाखानी समाजांसाठी स्वतंत्र औकाफ मंडळ स्थापन करण्याची सूचनाही या विधेयकात समाविष्ट आहे. वक्फ बोर्डाचं काळानुरूप आधुनिकीकरण करणं आणि या मध्ये सर्वसमावेशक प्रतिनिधीत्व आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे.

**बळवंत वानखडे**

विदर्भात जागतिक दर्जाची उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था उभारणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे अमरावतीमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी स्थापन करण्याची मागणी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली आहे.अमरावती मध्ये आयआयटी स्थापन झाल्यास उद्योग, स्टार्टअप आणि संशोधन संस्थांही अमरावतीकडे आकर्षित होतील, या संदर्भात शिक्षण मंत्र्यांसोबत भेट घेऊन खासदार वानखडे यांनी चर्चा केली.

**मंत्रिमंडळ निर्णय**

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन करण्यासाठी महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यामुळे पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. याशिवाय अन्य महत्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले.

यात प्रकल्पबाधितांना सदनिका मिळण्यासाठी धोरणास मान्यता, लहान शहरांतील पायाभूत सुविधांसाठी कर्ज उभारण्यास मान्यता, आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ, अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर करण्यात येणार, तसंच विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार दंड ठोठावण्यात येणार आहे. आज घेण्यात आलेल्या अन्य निर्णयात लॉजिस्टिक धोरण, हर घर तिरंगा अभियान आदींचा समावेश आहे.

**पोटनिवडणुक**

खासदार छत्रपती उदयनराजे भोसले आणि खासदार पियूष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या दोन जागांच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या तीन सप्टेंबरला मतदान होणार आहे. निवडणूक आयोगानं आज या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला. राज्यासह देशभरातल्या राज्यसभेच्या १२ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. त्यासाठी या महिन्याच्या १४ तारखेला अधिसूचना जारी केली जाणार आहे. ३ सप्टेंबरला मतदान होणार असून ६ सप्टेंबरला निकाल जाहीर केले जातील.

## आदिवासी दिवस

जागतिक आदिवासी दिनानिमित्त राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून भरवल्या जाणाऱ्या तीन दिवसीय आदिवास महोत्सवाला नंदुरबारमध्ये सुरवात झाली आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ सुप्रिया गावित,माजी खासदार डॉ हिना गावित, यांच्या उपस्थितीत या महोत्सवाचं आज उदघाटन करण्यात आलं. या महोत्सवात दोन दिवस राज्यातील आदिवासी कला पथकांमध्ये नृत्य स्पर्धा रंगणार आहे. महोत्सवासाठी आदिवासी बचत गटांना त्यांनी उत्पादीत केलेल्या मालाच्या विक्रीसाठी स्टॉलदेखील उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

## हातमाग दिवस

दहावा राष्ट्रीय हातमागदिवस आज साजरा करण्यात येत आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिल्लीतल्या विज्ञानभवनात या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते संत कबीर पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय कारागिरांच्या प्रयत्नांचे कौतुक करताना त्यांनी सरकारच्या 'व्होकल फॉर लोकल' या उपक्रमासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

'हातमागाच्या उत्पादनांना गत वैभव मिळवून देण्यासाठी त्यांच्या मार्केटिंग करिता पुढाकार घेण आवश्यक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय सूक्ष्म लघु आणि मध्यम मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या खादी आणि ग्रामोद्योग महामंडळाचे केंद्रीय सदस्य जयप्रकाश गुप्ता यांनी आज केलं. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत नागपूरच्या विणकर सेवा केंद्राद्वारे, आज 10 वा राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात हातमाग वस्तूंचं प्रदर्शन देखील भरवण्यात आलं तसच केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे हातमाग क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्राप्त विणकारांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला हातमाग विणकर, हातमाग निर्यातदार, उद्योजक, हातमाग व्यावसायिक आणि विणकर सेवा केंद्राचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**अत्तराच्या गोदामाला आग**

नागपूर शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या इतवारी परिसरातील खापरपुरा इथल्या अत्तराच्या गोदामाला आज पहाटेच्या सुमारास आग लागल्याने एका मुलीचा मृत्यू झाला, तर तिघे गंभीर जखमी असून त्यांना उपचारासाठी मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. अग्निशमन विभागाच्या आठ गाड्या घटनास्थळी पोहोचल्यानंतर आग नियंत्रणात आणली गेली.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे संपूर्ण गोडाऊन असलेल्या रहिवाशी इमारतीमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागली. घटनेची माहिती मिळताच कळमना, कॉटन मार्केट, गंजीपेठ आणि सक्करदरा अग्निशमन केंद्रातर्फे तत्परतेने संयुक्तिक कार्य करून आग विझविण्याचं कार्य हाती घेण्यात आलं. या घटनेत मोठं आर्थिक नुकसान झाल्याचं सांगितलं जात आहे.

**व्हीएनआयटी अंतराळ दिवस**

२३ ऑगस्ट या राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त नागपुरातील व्हीएनआयटी संस्थेद्वारे इसरो, ऍक्सिस आणि विज्ञान भारती यांच्या सहकार्याने उद्या आठ ऑगस्ट रोजी एक दिवसीय कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. चांद्रयान 3 चे प्रकल्प संचालक डॉ. पी. वीरमुथुवेल यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल. 'चंद्र संशोधन आणि अंतराळ' मोहिमेबाबत ते बोलणार आहेत. तर विज्ञान कार्यक्रम कार्यालयाच्या संचालिका डॉ.तीर्थ प्रतिम दास 'अंतराळ विज्ञानातील प्रगती आणि त्याचा तांत्रिक विकासावर होणारा परिणाम' या विषयावर सखोल दृष्टीकोन प्रदान करतील. दिवसभर चालणाऱ्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाविषयी मौल्यवान ज्ञान प्राप्त करता येणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंकेदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला तिसरा सामना आज कोलंबो इथं खेळला जात आहे. श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. श्रीलंकेच्या संघानं जिंकण्यासाठी भारतापुढे २४९ धावांचं उद्दिष्ट ठेवलं आहे

**हवामान**

आगामी काही तासात विदर्भातील भंडारा जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी तर  गोंदिया, वर्धा, नागपूरमध्ये अनेक ठिकाणी आणि  चंद्रपूर अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशीम जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली  आहे. दरम्यान आज गोंदिया आणि गडचिरोली इथं पावसाचा ऑरेंज  अलर्ट देण्यात आला असून चंद्रपूर आणि भंडारा इथं देखील आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

गडचिरोली जिल्ह्यात जोरदार पाऊस झाल्यानं जनजीवन विस्कळीत झाल्याची माहिती नुकतीच आमच्या प्रतिनिधीने दिली आहे